# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक** :— क्र.मशिमाक/२८ /२०२४—२०२५

संदर्भ :— १) सीटीएयु/११/२०२४—२०२५ दिनांक १ जुलै, २०२४
२) मशिमाक/२३/२०२४—२०२५ दिनांक १९ ऑगस्ट, २०२४

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व कायम विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि समाजशास्त्र, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पदोन्नती मिळण्यासाठी आवश्यक असलेले उद्बोधन वर्ग (Orientation Course (OC) / Refresher Course (RC))पूर्ण करण्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने आश्वासित प्रगती योजनेनुसार यापूर्वी ज्या शिक्षकांनी उद्बोधन वर्ग (Orientation Course) उजळणी वर्ग (Refresher Course) पूर्ण केले आहे, त्या तारखेपासून त्यांना पदोन्नतीचा लाभ दिलेला आहे.

परंतु, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्र २३०९ प्र. क्र. १२८ विशि—१ दिनांक २४ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये ज्या शिक्षकांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत उद्बोधन वर्ग (Orientation Course) उजळणी वर्ग / (Refresher Course) पूर्ण केले आहे, त्यांना त्यांच्या देय (Due date) दिनांकापासून पदोन्नतीचा लाभ देण्यासाठी संबंधी शिक्षकांचे प्रस्ताव (वेगवेगळया स्तराकरिता वेगवेगळे प्रस्ताव) सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये सर्व माहिती भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह जसे नियुक्ती पत्र, रूजु अहवाल, विद्यापीठाचे नियुक्तीस मान्यता दिलेले सर्व पत्र, शैक्षणिक कागदपत्रे (सेट/नेट, एम.फिल, पीएच. डी), छाननी व मूल्यमापन समितीचा अहवाल, मागासवर्गीय उमेदवाराचे जात व जात वैधता प्रमाणपत्र मागील स्थाननिश्चितीस विद्यापीठाने मान्यता दिलेले पत्रांच्या प्रती, रिफ्रेशर कोर्स व ओरिएंटेशन कोर्स, इत्यादी पुर्ण केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह प्रस्ताव मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत सादर करावेत.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :—१२ डिसेंबर, २०२४

( डॉ. प्रसाद कारंडे )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

..२/—

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानीत/विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, नृत्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई—४०० ०३२.
२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — ४११ ००१.
३. मा. सह—संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.
४. मा. सह—संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड — ४१० २०६.
५. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
८. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८.
९. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

# University of Mumbai

**Statement of Orientation and Refresher course regarding revising the date of promotions under CAS due to extension till 31st December, 2023.**

**(Note- Kindly submit separate sheet for each stage)**

**Name of the College: -** ____________________

**Name of the Teacher:-** ____________________

**Subject :** ______________ **Category** ______________ **Promotion Stage** ______________

| Date of Birth and Qualifications | Year of obtaining Ph. D/ M. Phil Degree/s & NET/SET | Date of regular appointment in college (with letter No. and date) | Requirement for promotion from stage 1 to stage 2 Orientation /Refresher Course completion dates | Requirement for promotion fromstage 2 to stage 3 Orientation /Refresher Course/s completion dates | Old date of Placement (w.e.f.) from stage 1 to stage 2 & stage 2 to stage 3 | Revised date of promotion as per government Resolution dated 24th June, 2024. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Approval date:<br><br>letter No. & Date | | | | |

(Sign of Teacher)

(Sign of Co-ordinator) IQAC of College

( Sign of Principal) with stamp